# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO 9001:2008) (ISO/IEC 27001:2005)

४ था मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.

दू.क्र. : २६४७५०७७/२६४७७२०९ फॅक्स : ९१–०२२–२६४७३९८०

ई–मेल : secretary@msbte.com संकेत स्थळ : www.msbte.com


जा.क्र.मरातंशिमं/का-४०(परीक्षा)/लले/बी-७८/हि.प.१६/२०१७/ 07 दिनांक – ११/१/२०१७

**अत्यंत महत्त्वाचे**

प्रति,

प्राचार्य / संस्थाप्रमुख,

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी

संलग्न असलेल्या संस्था –

विषय :- निकाल जाहिर केल्यानंतर निकालपत्रक व गुणपत्रिका तपासून कार्यवाही करण्याबाबत.
परीक्षोत्तर कामांच्या सूचनांचे परिपत्रक (हिवाळी परीक्षा – २०१६)

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या हिवाळी २०१६ च्या परीक्षांचा निकाल मंडळाच्या संकेतस्थळावर **दि. ११/०१/२०१७** रोजी घोषित करण्यात आला असून त्या अनुषंगाने खालील सूचनांचे पालन करण्यात यावे.

निकाल जाहीर केल्यानंतर पुढील तीन दिवसांत संस्थेच्या Login मध्ये निकालपत्रकाच्या Gazette ची PDF फाईल उपलब्ध करुन देण्यांत येईल. निकालपत्रक RBTE मार्फत प्रिंट करुन संस्थांना गुणपत्रिका व निकालपत्र वितरीत करण्यांत येईल. संस्थेच्या प्रतिनिधीने निकालपत्रके घेतांना तपासून घ्यावीत व त्याबाबतची माहिती विभागीय कार्यालयाकडे तात्काळ सादर करावी. गुणपत्रिका तथा निकालपत्रके पूर्ण प्राप्त झाली आहेत किंवा नाही याची शहानिशा करणे संस्थेची संपूर्ण जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन निकालाबाबत काही त्रुटी असल्यास त्याबाबतची माहिती दि. २१/०१/२०१७ पर्यंत मुख्य कार्यालयास कळविण्याबाबत दक्षता घ्यावी. हिवाळी परीक्षा २०१६ च्या निकालाच्या पार्श्वभूमीवर निघालेल्या मागील परीक्षेमधील LSP/WFLS च्या गुणपत्रिका व प्रोव्हीजनल प्रमाणपत्र हिवाळी परीक्षेच्या गुणपत्रिकेबरोबरच वितरीत करण्यांत येणार आहेत. तरी सर्व संस्थांनी त्यांच्या संस्थेत निघालेल्या WFLS / WFLY ची माहिती अचूक तयार करुन त्याप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका व प्रोव्हीजनल प्रमाणपत्रे तपासून घ्यावीत.

**निकाल जाहिर झाल्यानंतर खालील सूचनांचे पालन करण्यात यावे.**

१. सी, इ व जी या सर्व अभ्यासक्रमाचा निकाल सत्रनिहाय जाहिर करण्यात आला आहे. सत्रपध्दतीतील निकाल जाहीर करण्याच्या पध्दतीबाबत या कार्यालयाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-**४०**/का-**४५**/ बी-**३३**/**२०१०**/**४३९** दिनांक **१२.१०.२०१०** चे पुनश्च बारकाईने अवलोकन करावे. शीघ्र संदर्भासाठी सदरचे परिपत्रक या सोबत जोडलेले आहे.

२. निकालपत्रक व गुणपत्रिका अभ्यासक्रमनिहाय स्कीमनुसार तपासून त्यानंतर गुणपत्रिका विद्यार्थ्यांना वितरीत कराव्यात.

३. अंतिम सत्राचा / वर्षाच्या विद्यार्थ्यांना गुणपत्रिका वितरित करतांना मागील सर्व सत्र उत्तीर्ण आहे यांची तपासणी करुन त्यानंतर गुणपत्रिका वितरित कराव्यात.

४. सर्व सत्राच्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका वितरित करतांना CPS, Condonation, Change of Scheme, Change of Course, Change of Institute, Disallowed (Dis), Eligibility Certificate इत्यादी बाबी तपासून त्या अचूक असल्याची खात्री करुनच विद्यार्थ्यांना गुणपत्रिका वितरित कराव्यात.

५. नियम RE- ८ व नियम RE-१८ प्रमाणे अनुक्रमे श्रेणीवाढ तथा फेर परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे गुण त्यांनी दिलेल्या विषयाप्रमाणे आहेत. याबाबत खात्री करुन तद्नंतरच विद्यार्थ्यास गुणपत्रिका दयावी.

६. विद्यार्थ्यांना सत्रनिहाय प्रथम श्रेणीमध्ये (६० टक्के) तथा प्राविण्यश्रेणीमध्ये (७५ टक्के) एकूण गुणांच्या ०.५ टक्के इतक्या गुणांचे ग्रेस मार्कींग प्रदान करण्यात येते. निकालपत्राप्रमाणे अशा विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांवरही सदर गुणवाढ नोंदविण्यात आल्याची छाननी करुनच सदर गुणपत्रिका विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात यावी.

७. ज्या विद्यार्थ्याचे निकाल "+ **RHR** " (Forced RHR) असे जाहीर करण्यांत आले आहेत. अशी प्रकरणे निकाली काढण्याकरीता योग्य तो पाठपुरावा मंडळाकडे करणे आवश्यक आहे. **मंडळाने RHR असलेल्या विद्यार्थ्यांचा परीक्षा अर्ज जो पर्यत संस्थेकडून RHR प्रकरण निकाली निघत नाही तो पर्यत विद्यार्थ्याचा परीक्षा अर्ज Online उपलब्ध न करुन देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे.अशा सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज वेळेत भरुन न घेतल्यास त्याची सर्व जबाबदारी संस्थेवर राहिल.**

८. हिवाळी परीक्षा २०१६ मध्ये परीक्षा केंद्राकडून तथा गुणमुल्यांकन केंद्राकडून प्राप्त गैरप्रकाराच्या प्रकरणांबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात आली असून दोषी व निर्दोष विद्यार्थ्यांची माहिती संस्थांच्या Login मध्ये देण्यात आलेली आहे.

९. नावात दुरुस्ती करावयाची असल्यास त्याबाबत विस्तृत माहिती ( उदा. परीक्षेचे वर्ष, आसन क्रमांक इत्यादी ) पाठवावी. नावात दुरुस्तीसाठी विहित पध्दतीनुसार मेरिट लिस्ट, दहावीच्या गुणपत्रिकेची /प्रमाणपत्राची / लिव्हींग सर्टिफिकेट इत्यादीची प्रमाणित प्रत पाठवावी. अंतिम सत्र/वर्षापूर्वीच्या सत्रांतील/वर्षातील परीक्षेच्या गुणपत्रिकांमध्ये/ प्रमाणपत्रांमध्ये नावांत बदल करावयाचा असल्यासही आवश्यक कागदपत्रे सादर करावीत. ज्या विद्यार्थ्यांच्या नावांत बदल अपेक्षित आहे त्यांना गुणपत्रिका/प्रमाणपत्र वितरीत करण्यात येवू नयेत.

१०. ब-याचशा संस्था निकाल जाहीर झाल्यानंतर **SW, PR, OR, TW, TM** इत्यादी विषयांचे चुकीचे गुण परीक्षकांच्या गुणपत्रिकेत भरुन पाठविण्यांत आल्याचे कळवितात व सुधारीत गुण घेण्याबाबतचा प्रस्ताव मंडळाकडे सादर करतात. याबाबत आपणांस नमूद करण्यांत येते की, परीक्षकांने गुणपत्रिकेत गुण भरल्यानंतर व ते Confirm केल्यानंतर पुन्हा गुणांमध्ये बदल करण्याबाबतचा प्रस्ताव स्विकारला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

११. मंडळाकडून विद्यार्थ्यांसाठी सर्वसाधारण गुणपडताळणी व सर्वसाधारण फोटोकॉपी, रिॲसेसमेंट ची सुविधा देण्यात आलेली आहे. याबाबतचे स्वतंत्र वेळापत्रक देण्यात आलेले असून या सर्व सुविधांसाठी विद्यार्थ्यांचे अर्ज Online पध्दतीने त्या त्या सुविधेच्या विहित मुदतीतच भरुन घ्यावयाचे आहेत. सदर वेळापत्रक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.

- विद्यार्थ्यांचा रिअसेसमेंटचा online अर्ज Confirm करताना विद्यार्थ्यांस मिळालेल्या हिवाळी परीक्षा २०१६ च्या गुणपत्रिका संस्थेकडे जमा करुन घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्याशिवाय online अर्ज Confirm होणार नाही ही नोंद घ्यावी. विद्यार्थ्यांचे रिअसेसमेंटचे निकाल change म्हणून आल्यास त्याला change गुणपत्रिका मिळण्यासाठी संस्थेत जमा असलेल्या मूळ गुणपत्रिका विभागीय कार्यालयात जमा करणे बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी. No change प्रकरणात विद्यार्थ्यांची मूळ गुणपत्रिका त्यास परत देण्यात यावी.
- या सर्व कार्यक्रमांचे वेळापत्रक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्याची जबाबदारी संस्थांची आहे व त्याचे पालन संस्थांनी काटेकोरपणे करावयाचे आहे.
- ज्या विद्यार्थ्यांचे निकाल आर एच आर / प्लाय / डब्ल्यू एफ एल वाय / एल एस पी / डब्ल्यू एफ एल एस असे नमुद करण्यात आलेले आहेत त्या विद्यार्थ्यांनीसुध्दा फोटोकॉपी तथा पुनर्गुणमुल्यांकनासाठी याच कालावधीत अर्ज करावयाचे आहेत. निकालपत्रकावरुन गुण पाहून सदर कार्यवाही विद्यार्थ्यांनी करावयाची आहे.
- ॲकेडमिक कॅलेंडरमध्ये निर्देशित केल्याप्रमाणे सैध्दान्तिक उन्हाळी परीक्षा- २०१७ दिनांक ११ एप्रिल २०१७ पासुन सुरु होणार असल्याने व पुनर्मुल्यांकनाचे निकाल येण्यास सोबतच्या फोटोकॉपी तथा रिॲसेसमेंटच्या वेळापत्रकाप्रमाणे आवश्यक किमान कालावधी लागणार असल्याने अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज विहित मुदतीत भरणे आवश्यक आहेच त्याचबरोबर त्या त्या अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा देणे अनिवार्य आहे.

१२. सी अभ्यासक्रमांतील प्रथम / व्दितीय / तृतीय / चतुर्थ / पांचवे सत्रांतील विषयांमध्ये अनुत्तीर्ण अशा ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम / व्दितीय / तृतीय / चतुर्थ / पाचव्या सत्राच्या अभ्यासक्रमांचे १०० गुणांचे पेपर्स सोडविलेले आहेत त्यांचे गुण ८० पैकी परिवर्तीत करण्यात आलेले आहेत व ते गुणपत्रिकेत दर्शविण्यात आलेले आहेत. मात्र अशा विद्यार्थ्यांनी फोटोकॉपी मिळण्याबाबतची विनंती विहित पध्दतीने केलेली असल्यास त्यांच्या फोटोकॉपीवर नोंदविलेले गुण १०० पैकी असणार आहेत याची विद्यार्थ्यांना जाणीव करुन देण्यात यावी. याप्रमाणे E अभ्यासक्रमामधील विद्यार्थ्यांनी G अभ्यासक्रमामधील समकक्ष विषय दिले असल्यास त्याचे गुण मूळ E अभ्यासक्रमाप्रमाणे परिवर्तन करण्यांत आलेले आहेत.

१३. अशा प्रकरणांची गुणपडताळणी करताना गुणमुल्यांकन केंद्रांनी समकक्ष विषयाचे गुण ग्राह्य धरुनच गुणपडताळणी करावी व बदल ना-बदल प्रकरणे पाठवितांना विशेष दक्षता घेण्यात यावी.

१४. ज्या विद्यार्थ्यांचे निकाल आर एच आर/ डब्ल्यू एफ एल वाय/ पी एल वाय/ एल एस पी/ डब्ल्यू एफ एल एस अशा प्रकारच्या सदरांत आलेले आहेत अशा विद्यार्थ्यांची पूर्व माहिती (इतिहास) संस्थेतच आहे, ती पडताळून घेऊन विद्यार्थी अनुत्तीर्ण होत असल्यास त्यांचेकडून विहित मुदतीत पुढील परिक्षेकरीता अर्ज भरुन घ्यावेत. उपरोक्त बाबींत विद्यार्थ्यांचा निकाल विलंबाने लागला म्हणून परीक्षा अर्ज स्वीकारण्याची मुदत वाढवून मिळणार नाही याची कृपया नोंद घ्यावी व याबाबतची स्पष्ट सूचना विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

१५. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चे शैक्षणिक वेळापत्रक (अॅकेडमिक कॅलेंडर) मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे. **या शैक्षणिक वेळापत्रकामध्ये उन्हाळी परीक्षा २०१७ साठीच्या सर्व उपक्रमांच्या पूर्ततेचा विहित कालावधी (परीक्षा अर्ज भरण्याचा कालावधी, विलंबाने अर्ज भरण्याचा कालावधी इत्यादी) नमुद करण्यात आलेला आहे.** या सर्व विविध उपक्रमांचे कालावधीप्रमाणे तंतोतंत पालन करण्यात यावे.

१६. ज्या विद्यार्थ्यांना नोंदणी क्रमांक मिळाला असून ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरल्यानंतर प्रवेश रद्द केला असल्यास अशा विद्यार्थ्यांची माहिती संस्था स्तरावर एकत्रित करुन विभागीय कार्यालयामार्फत पाठविण्यांत यावी.

१७. सर्वसाधारण गुणपडताळणी आणि फोटोकॉपी तथा पुनर्गुणमुल्यांकनाच्या कार्यक्रमांची वेळापत्रकाप्रमाणे अचूक अंमलबजावणी ह्या महत्त्वाच्या बाबींसंदर्भाने सदर परिपत्रकानुसार संस्थांनी कार्यवाही करावयाची आहे. विविध उपक्रमांच्या अनुषंगाने मंडळाकडून ऑन लाईन प्रणालीचा अवलंब करण्यात येत आहे. संस्थांनी सदर प्रणालीच्या अवलंबनामध्ये अधिक काटेकोरपणा आणण्याची आवश्यकता आहे.

१८. मंडळाच्या निकाल प्रक्रियाविषयक सर्व बाबी (नोंदणी अर्ज, परीक्षा अर्ज, मेन सिटींग चार्टची संगणकीय प्रणालीवरुनच केली जाणारी तपासणी) संगणकीय प्रणालीव्दारे पूर्ण करताना त्यामध्ये अपेक्षित असणारी अचूकता ही सर्व संस्थांच्या उचित पध्दतीच्या कामावर आणि वेळोवेळी निर्गमित केल्या जाणा-या परिपत्रकांतील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यावरच अवलंबून आहे. त्यामुळे परिपत्रकांचे अचूक काटेकोरपणे पालन करण्यावर व त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यावर संस्थांनी अधिक भर देण्याची आवश्यकता आहे व यामध्ये संस्थाप्रमुखांनी विशेष दक्षतापूर्वक आपली जबाबदारी पार पाडावयाची आहे.

१९. संस्थांच्या मागणी वरुन मागील तीन वर्षाचा संस्था व MSBTE चा थिअरी स्कोअर इंडेक्स (TSI) संस्थेच्या Login मध्ये उपलब्ध करुन देण्यांत आला आहे.

२०. कोणत्याही कारणामुळे जर विद्यार्थ्यांचा हिवाळी परीक्षा २०१६ चा निकाल सुधारणा करणे आवश्यक असल्यास ही सर्व प्रकरणे २१ जानेवारी पर्यत मंडळाच्या मुख्य कार्यालयात थेट सादर करणे आवश्यक आहे.

( डॉ. विनोद म. मोहितकर )
सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई — ५१

प्रत —

१. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - ४०० ०५१ यांना सादर.
२. उपसचिव, सी डी सी विभाग, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना माहितीसाठी
३. उपसचिव, परीक्षा विभाग, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना माहितीसाठी
४. उपसचिव,म.रा.तं.शि.मं.वि.का.मुंबई/पुणे/नागपूर/ औरंगाबाद यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.
५. कार्यासन अधिक्षक, का. क्र. ४३ - आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
६. पोर्टल व्यवस्थापक - संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO 9001:2008) (ISO/IEC 27001:2005)

४ था मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दू.क्र. : २६४७५०७७/२६४७७२०९ फॅक्स : ९१-०२२-२६४७३९८०

ई-मेल : secretary@msbte.com संकेत स्थळ : www.msbte.com

जा.क्र.मरातंशिमं/का-४०(परीक्षा)/लले/बी-७८/हि.प.१६/२०१७/ 09 दिनांक -११/१/२०१७

प्रति,
प्राचार्य / संस्थाप्रमुख,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी
संलग्न असलेल्या संस्था -

विषय -हिवाळी परीक्षेचा ( WINTER - 2016) चा निकाल जाहीर करणेबाबत

आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने घेतलेल्या हिवाळी २०१६ च्या परीक्षांचा (WINTER- 2016) निकाल दिनांक ११.०१.२०१७ रोजी मंडळाच्या संकेतस्थळावर घोषित करण्यात येत आहे.

संस्थांची अभ्यासक्रमनिहाय निकालपत्रके व विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका दिनांक ०१.०२.२०१७ पर्यंत विभागीय कार्यालयात उपलब्ध होतील. तरी गुणपत्रिका काळजीपूर्वक तपासून दिनांक ०४.०२.२०१७ पूर्वी विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात याव्यात.

( डॉ. विनोद म. मोहितकर )
सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई – ५१

प्रत-

१. संचालक, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना माहितीसाठी सादर
२. उपसचिव,म.रा.तंत्र शिक्षण मंडळ वि.का. मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी
३. प्रणाली विश्लेषक, का. क्र. ४३ परीक्षा विभाग, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना माहितीसाठी
४. पोर्टल मॅनेजर, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना सदर परिपत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात यावे.

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

क्रमांक - डी-४०/ गुणपडताळणी -फोटोकॉपी-रिॲसेसमेंट/२०१६/ 08

दिनांक - ११/१/२०१७

## हिवाळी परिक्षा –२०१६

## गुणपडताळणी / फोटोकॉपी तथा रिॲसेसमेंटबाबतचा कार्यक्रम

| अ.क्र. | कार्यक्रम | कालावधी/दिनांक |
|---|---|---|
| **उत्तरपत्रिकेची गुणपडताळणी / फोटोकॉपी व पुर्नगुणमुल्यांकन बाबतचा कार्यक्रम** | | १६.१.२०१७ **ते** १०.०३.२०१७ |
| **अ)** | **उत्तरपत्रिकेची गुणपडताळणी /फोटोकॉपी मिळण्याबाबतचा कार्यक्रम** | १६.१.२०१७ ते ०७.०२.२०१७ |
| १ | विद्यार्थ्याने गुणपडताळणी /फोटोकॉपीचा online पध्दतीने विनंती अर्ज सादर करण्याचा कालावधी | १६.०१.२०१७ ते १८.०१.२०१७ |
| २ | विद्यार्थ्याने ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट कॉपी संस्थेत सादर करावयाची असून संस्थेने त्याप्रमाणे अर्जाची छाननी करुन विहित शुल्क स्वीकारुन अर्ज अंतिमत: कन्फर्म करण्याचा कालावधी (Institute should confirm the same INSTANTLY) | १७.०१.२०१७ ते १९.०१.२०१७ |
| ३ | संस्थेने सदर कन्फर्म केलेल्या विद्यार्थ्यांची एकत्रित यादी विभागीय कार्यालयाने शुल्कासहीत स्वीकारण्याचा कालावधी | २१.०१.२०१७ |
| ४ | प्राप्त झालेला सर्व संस्थांचा डाटा विभागीय कार्यालयाने मुख्य कार्यालयाकडे Upload करुन पाठविण्याचा दिनांक | २३.०१.२०१७ |
| ५ | मुख्य कार्यालयाने सदर माहिती गुणमुल्यांकन केंद्रनिहाय ॲलोकेशन (वर्गीकरण) करुन संबंधित गुणमुल्यांकन केंद्रांना आणि विभागीय कार्यालयांना प्रणालीव्दारे माहिती पाठविण्याचा दिनांक | २४.०१.२०१७ |
| ६ | गुणमुल्यांकन केंद्राने मंडळाच्या निर्देशांनुसार करावयाच्या कार्यवाहीचा कालावधी | २४.०१.२०१७ ते २७.०१.२०१७ |
| ७ | गुणमुल्यांकन केंद्राने कार्यवाही पूर्ण करुन पी सी डी सी कडे खालील प्रमाणे वर्गीकरण करुन स्वतंत्र सिलंबद पाकिटे पाठविण्याचा कालावधी<br>पाकीट - A) गुणपडताळणीत गुणबदल झालेल्या एकूण प्रकरणांच्या मूळ उत्तरपत्रिका (प्रश्नपत्रिकासह)<br>पाकीट - B) फोटोकॉपीत गुणबदल झालेल्या एकूण प्रकरणांच्या मूळ उत्तरपत्रिका (प्रश्नपत्रिकासह)<br>पाकीट -C) फोटोकॉपीसाठी अर्ज केलेल्या परंतु गुणबदल न झालेल्या एकूण प्रकरणांच्या मूळ उत्तरपत्रिका<br>पाकीट -D) फोटोकॉपीसाठी अर्ज केलेल्या सर्व मूळ उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती | २८.१.२०१७ ते ३०.०१.२०१७ |
| ८ | पी सी डी सी कडे प्राप्त गुणबदलाच्या प्रकरणांच्या फोटोकॉपी विभागीय कार्यालयाने त्रिसदस्यीय समिती गठीत करुन तपासण्याचा व मंडळाच्या निर्देशांप्रमाणे कार्यवाही करण्याचा कालावधी | ३१.०१.२०१७ ते ०२.०२.२०१७ |

| | | |
|---|---|---|
| ९ | पी सी डी सी ने प्राप्त फोटोकॉपींची पाकिटे विहित कार्यवाही करुन अन्य पी सी डी सी कडे पाठविण्याचा कालावधी | ०३.०२.२०१७ |
| १० | गुणबदल झालेली प्रकरणे विभागीय कार्यालयाने ऑन लाईन मुख्य कार्यालयाकडे तथा संबंधित विभागीय कार्यालयांकडे पाठविण्याचा दिनांक | ०४.०२.२०१७ |
| **११** | **गुणपडताळणी /फोटोकॉपी निकाल online जाहीर करण्याचा दिनांक** | **०६.०२.२०१७** |
| १२ | पी सी डी सी ने उत्तरपत्रिकेची फोटोकॉपी संबंधित संस्थेकडे पाठविण्याचा कालावधी | ०४.०२.२०१७ ते ०५.०२.२०१७ |
| १३ | संस्थेने आवश्यक ती नोंद करुन संबंधित विद्यार्थ्यास /अर्जदारास फोटोकॉपी देण्याचा कालावधी | ०५.०२.२०१७ ते ७.०२.२०१७ |
| **ब)** | **रिॲसेसमेंट (पुनर्गुणमुल्यांकन) करण्याच्या विद्यार्थ्यांच्या विनंतीबाबतचा कार्यक्रम**<br>**महत्त्वाची सूचना – सैध्दान्तिक उन्हाळी परीक्षा- २०१७ एप्रिल महिन्याच्या प्रथम आठवड्यात सुरु होत असल्याने व पुनर्मुल्यांकनाचे निकाल येण्यास खालीलप्रमाणे किमान आवश्यक कालावधी लागणार असल्याने अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरुन त्या त्या विषयाची परीक्षा देणे अनिवार्य आहे.** | |
| १ | विद्यार्थ्याने फोटोकॉपीनिहाय विषयांच्या रिॲसेसमेंटसाठी ऑन लाईन पध्दतीने करावयाच्या विनंती अर्जाचा कालावधी | ६.०२.२०१७ ते ०८.०२.२०१७ |
| २ | विद्यार्थ्याने प्रिंट कॉपी मूळ गुणपत्रिकेसह संस्थेकडे सादर करावयाची असून संस्थेने त्याप्रमाणे अर्जाची अचूक छाननी करुन विहित शुल्कासह अर्ज स्वीकारण्याचा कालावधी | ७.०२.२०१७ ते ०९.०२.२०१७ |
| ३ | संस्थेने कन्फर्म अर्जानुसार विहित याद्यांसह शुल्क धनाकर्षाव्दारे विभागीय कार्यालयाकडे सादर करुन विभागीय कार्यालयाकडून confirm करुन घेण्यांचा कालावधी | ११.०२.२०१७ |
| ४ | विभागीय कार्यालयकडून मुख्य कार्यालयाकडे data uploading | १२.०२.२०१७ |
| ५ | मुख्य कार्यालयाने सदर माहिती वर्गीकृत करुन संबंधित / पी.सी.डी.सी व गुणमुल्यांकन केंद्रांकडे पाठविण्याचा दिनांक | १३.०२.२०१७ |
| ६ | पी सी डी सी ने पुर्नगुणमुल्यांकनासाठी अर्ज केलेल्या मूळ उत्तरपत्रिका संबंधित आर.आर. ए. सी. कडे पाठविणे व उर्वरीत मूळ उत्तरपत्रिका संबंधित आर.ए.सी.कडे पाठविणे | १३.०२.२०१७ |
| ७ | आर आर अे सी ने करावयाच्या पुनर्गुणमुल्यांकनाच्या कार्यवाहीचा कालावधी | १५.०२.२०१७ ते २१.०२.२०१७ |
| ८ | आर आर अे सी मध्ये केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने त्रिसदस्यीय समितीने करावयाची छाननी व त्या अनुषंगाने निर्गमित करावयाच्या आदेशांचा कालावधी | २०.०२.२०१७ ते २२.०२.२०१७ |
| ९ | विभागीय कार्यालयांनी मुख्य कार्यालयाकडे पुनर्गुणमुल्यांकनाचा अहवाल ऑन लाईन पध्दतीनेही सादर करण्याचा कालावधी | २३.०२.२०१७ |
| **१०** | **पुर्नमुल्यांकनाचा निकाल online जाहीर करण्याचा दिनांक** | **२५.०२.२०१७** |
| ११ | पुर्नमुल्यांकनामध्ये गुणबदल प्रकरणानुसार निकाल दुरुस्ती करण्याचा कालावधी | २६.०२.२०१७ ते ०१.०३.२०१७ |

| | | |
|---|---|---|
| १२ | निकालदुरुस्तीनंतर सुधारित गुणपत्रिका संबंधित विभागीय कार्यालयाकडे पाठविण्याचा कालावधी | ०३.०३.२०१७ |
| १३ | संस्थेने सुधारित गुणपत्रिका विद्यार्थ्यांना देण्याचा कालावधी | ०६.०३.२०१७ ते १०.०३.२०१७ |

टिप –

१) **संस्थांनी उपरोक्त तक्त्यातील विद्यार्थ्यांशी संबंधित तारखा सूचना फलकावर लावून विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणाव्यात. विद्यार्थ्यांनी ऑन लाईन अर्ज भरताना माहिती अत्यंत अचूक भरावयाची असून अर्ज SUBMIT केल्यानंतर संस्थेच्या लॉगीनमध्ये तो जमा झाल्याची खातरजमा विद्यार्थ्यांने करावयाची आहे. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी फोटोकॉपी मिळण्यासाठी अर्ज केलेला असला तरी परीक्षा अर्ज विहित कालावधीतच सादर करणे तथा पुनर्गुणमुल्यांकनाचा निकाल प्राप्त होण्यापूर्वीच परीक्षा सुरु झाल्या असल्यास ज्या विषयांसाठी अर्ज केला आहे त्या विषयांची परीक्षा देणेही आवश्यक आहे. विद्यार्थ्यांने प्रिंट कॉपीसह संस्थेस अर्ज कन्फर्म करण्याची विनंती केल्यास सदर प्रिंटकॉपीनुसार संस्थेने ऑन लाईन अर्जाची छाननी करावी आणि अर्ज कन्फर्म करुन फोटोकॉपी/गुणपडताळणी /पुनर्गुणमुल्यांकन यांचे शुल्क स्वीकारण्यात यावेत.**

२) **फोटोकॉपी मधील गुणांमध्ये बदल असल्यास संस्थेच्या प्राचार्यांमार्फत संबंधित विभागीय कार्यालयाकडून गुणबदलासाठी पाठपुरावा करुन गुण Online बदलून घेण्यांत यावेत.**

३) **विद्यार्थ्यांने फोटोकॉपीमधील गुणांत फरक असताना अ.क्र.२ नुसार कार्यवाही न करता रिअसेसमेंटसाठी अर्ज केल्यास फोटोकॉपीमधील गुणांचा बदल ग्राह्य धरला जाणार नाही व रिअसेसमेंट मध्ये मिळालेले गुण अंतिम गुण म्हणून ग्राह्य धरले जातील ही बाब संबंधित विद्यार्थ्यांना रिअसेसमेंट साठी अर्ज करण्यापूर्वी प्रकर्षाने जाणीव करुन देण्यांत यावी.**

४) **संस्थेने विद्यार्थ्याचा रिअसेसमेंटचा अर्ज Confirm करतेवेळी विद्यार्थ्यासमोर दर्शविलेल्या मूळ गुणपत्रिका संस्थेत विद्यार्थ्यांकडून परत मिळाल्याबद्दलच्या चेक बॉक्स वर टिक ( ✓ ) करणे आवश्यक आहे. त्याशिवाय विद्यार्थ्याचा रिअसेसमेंटचा अर्ज Confirm होणार नाही.**

( डॉ. विनोद म. मोहितकर )
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई-५१

प्रत-

१. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना माहितीस्तव सादर
२. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ विभागीय कार्यालय. मुंबई /पुणे / नागपूर/ औरंगाबाद यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित
३. प्रणाली विश्लेषक, का. क्र. ४३ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी
४. पोर्टल मॅनेजर, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना सदर परिपत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात यावे.

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO:९००१:२००८)

शासकीय तंत्र निकेतन इमारत, चौथा मजला,
४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दूरध्वनी क्र. २६४७१२५५(का)/३२५०८७०६ (वै.) फॅक्स क्र :०२२-२६४७३९८०
Email: secretary @ msbte.com Web : www.msbte.com


---

जा.क्र. मरातंशिमं/का-४०/का-४५/बी-३३/२०१०/४३८ दिनांक - 12 OCT 2010

**अत्यंत महत्त्वाचे**

प्रति,
प्राचार्य
मंडळाशी संलग्नित सर्व संस्था

विषय - हिवाळी परीक्षा - २०१०
प्रथम, व्दितीय व तृतीय सत्रांच्या इ- अभ्यासक्रमांच्या निकाल जाहीर करण्याच्या पध्दतीबाबत.

सर्व संस्थाप्रमुखांना विदितच आहे की, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून इ- अभ्यासक्रमाचा अवलंब केला आहे. हिवाळी परीक्षा - २०१० पासून इ- अभ्यासक्रमाच्या प्रथम, व्दितीय आणि तृतीय सत्रांची परीक्षा घेतली जातानाच या तीन्ही सत्रांच्या निकाल जाहीर करण्याच्या पध्दतीमध्ये बदल करण्यात येत आहे. प्रामुख्याने हे बदल खालीलप्रमाणे असून सर्व बदल संबंधितांना उचित पध्दतीने समजावून सांगणे व त्याप्रमाणेच संस्थास्तरावरील कार्यवाही होणे अत्यंत आवश्यक आहे.

१. सी अभ्यासक्रमाप्रमाणेच प्रत्येक सत्राचा निकाल स्वतंत्रपणे जाहीर केला जाईल. निकालाचा स्टेटस त्या त्या सत्राच्या निकालाशीच संबंधित राहील. त्याचा मागील सत्राच्या निकालाशी संबंध राहणार नाही.

२. गुणपत्रिकेवर अथवा निकालपत्रावर इलिजिबल फॉर नेक्स्ट सेमिस्टर/ नॉट इलिजिबल फॉर नेक्स्ट सेमिस्टर अशा प्रकारचा शेरा येणार नाही.

३. मंडळाच्या परीक्षा नियमावलीतील नियम आर जी २ सी (अे) नुसार तृतीय तथा पाचव्या सत्राच्या प्रवेशासाठी अनुक्रमे प्रथम व व्दितीय तथा तृतीय व चतुर्थ सत्रांतील एकत्रित अनुत्तीर्ण विषयांची संख्या विचारात घेऊन नियम आर जी २ डी नुसार पात्रता ठरवली जाते. त्या प्रमाणेच तृतीय व पाचव्या सत्रातील प्रवेशाची कार्यवाही करावी.

४. तृतीय व पाचव्या सत्रांतील प्रवेशाची पात्रता ठरविण्यासाठी अनुक्रमे प्रथम व व्दितीय तथा तृतीय आणि चतुर्थ सत्रांतील एकत्रित कमाल अनुत्तीर्ण विषयांची संख्या गुणपत्रिकेवर व निकालपत्रामध्ये दिली जाईल. उदा. Maximum no. of failure subjects in I & II Semister together for CE course is 4 out of 14 याचाच अर्थ सी इ (स्थापत्य) अभ्यासक्रमातील विद्यार्थी, प्रथम व व्दितीय सत्रांसाठी एकूण एकत्रित विषयांपैकी ४ किंवा ४ पेक्षा कमी विषयांमध्ये अनुत्तीर्ण असेल तर तो तृतीय सत्र प्रवेशास पात्र आहे. विद्यार्थ्यांनी व संस्थांनी प्रथम व व्दितीय सत्राचा निकाल पाहून तृतीय सत्राच्या प्रवेशासाठी पात्र आहे की अपात्र आहे याची शहानिशा करुन घ्यावयाची आहे व त्याप्रमाणेच आवश्यक कार्यवाही करावयाची आहे. याचप्रमाणे पाचव्या सत्राच्या प्रवेशासाठी तृतीय व चतुर्थ सत्राचा निकाल पाहावयाचा आहे.

५. संस्थांच्या माहितीसाठी व्दितीय व चतुर्थ सत्राच्या निकालपत्रकावर अनुक्रमे प्रथम व तृतीय सत्राची हिस्ट्री (विषयनिहाय इतिहास) दिली जाईल, ज्यांत विद्यार्थी प्रथम/तृतीय सत्रात किती विषयांत अनुत्तीर्ण आहे त्यांची संख्या अंतर्भूत असेल. उदा. Ist Sem/W 11 09/CO 1 E / 449304/243/Fail Sub : 2 याचा अर्थ उपरोक्त विद्यार्थी प्रथम सत्रास हिवाळी परीक्षा - २००९ मध्ये सी ओ अभ्यासक्रमासाठी इ- स्कीममध्ये बसला होता आणि विद्यार्थ्यास एकूण २४३ गुण मिळालेत व तो २ विषयांमध्ये अनुत्तीर्ण आहे असा आहे.

६. संस्थांनी तृतीय व पाचव्या सत्राचे प्रवेश करताना प्रत्येक विद्यार्थ्याच्या अनुक्रमे प्रथम व व्दितीय तथा तृतीय व चतुर्थ सत्रांच्या गुणपत्रिका पाहाव्यात किंवा निकालपत्रकांतील मागील सत्राची हिस्ट्री (History) पहावी व विद्यार्थी दोन्ही सत्रांत एकत्रित कमाल अनुत्तीर्ण विषयांच्या संख्येइतक्या विषयांत अथवा त्यापेक्षा कमी विषयांत अनुत्तीर्ण असल्यासच त्यास प्रवेश देण्यात यावा.

७. विद्यार्थ्यांनीही आपण प्रवेशास पात्र आहोत की नाही याची खात्री करुन घेऊनच प्रवेश घ्यायचा आहे.

८. उपरोक्त सूचनांचे पालन न करता चुकीचे प्रवेश केले गेल्यास त्यास सदर विद्यार्थी आणि संस्था संपूर्णपणे जबाबदार राहतील व अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश कोणत्याही स्तरावर तात्काळ रद्द केले जातील याची नोंद घ्यावी.

९. मंडळाने परीक्षा विषयक नियमावलीत कोणताही बदल केलेला नसून निकाल जाहीर करण्याच्या पध्दतीमध्येच केवळ बदल केलेला आहे याची नोंद घ्यावी.

सी अभ्यासक्रमाच्या निकाल जाहीर होण्याच्या पध्दतीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नसून ते पूर्वीप्रमाणेच जाहीर होतीच याची विशेषत्वाने नोंद घ्यावी.

संस्था प्रमुखांनी उपरोक्त सर्व सूचना सभा घेऊन संबंधित प्राध्यापकांना तथा विभागप्रमुखांना अवगत करुन देण्यात याव्यात. सदर सभेची व उपस्थितीची नोद ठेवण्यात यावी. त्याचप्रमाणे प्रथम, व्दितीय तथा तृतीय सत्रांच्या प्रत्येक वर्गा-वर्गात प्राध्यापकांकरवी विद्यार्थ्यांना याबाबत विशेष माहिती द्यावी. त्याचप्रमाणे या परिपत्रकाची प्रत विद्यार्थ्यांच्या सूचना फलकावर लावण्यात यावी तथा प्रात्यक्षिकांच्या दालनामध्येही लावण्यात यावी जेणेकरुन या परिपत्रकास ठळक व उचितपणे प्रसिध्दी मिळेल.

संस्थाप्रमुखांनी सदर माहिती सर्व संबंधितांना उपरोक्त सूचनांप्रमाणे दिल्याबाबतचा अहवाल विभागीय कार्यालयाकडे सादर करावा.

(प्र. अं. नाईक)
सचिव
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत -

१. मा. संचालक, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना सविनय सादर
२. उपसचिव, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ,वि.का. पुणे/औरंगाबाद/नागपूर तसेच प्रभारी अधिकारी, मुंबई उपविभाग - यांना आवश्यक कार्यवाहीसाठी
३. प्रणाली विश्लेषक,का.क्र.४५, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई- यांना आवश्यक कार्यवाहीसाठी
४. अधिक्षक, परीक्षा विभाग, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना सुचित करण्यात येते की सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व संबंधित कर्मचा-यांना देण्यात यावे.
५. स्थळप्रत